# जि. प. पुणे व पं. स इंदापूर यांच्यावतीने ‘सायकल बँक’ लोकार्पण सोहळा...

## कृषी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या शुभहस्ते १११ विद्यार्थिनींना मोफत सायकल वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शाळांमध्ये जाण्यासाठी अनेक विद्यार्थिनींना दररोज लांबचा प्रवास करावा लागतो. या प्रवासामुळे त्यांची शालेय हजेरी कमी होते तसेच शिक्षणात अडथळे निर्माण होतात. या समस्येवर मात करून मुलींच्या शिक्षणात गती यावी, शाळेत नियमित उपस्थिती वाढावी आणि प्रवासाचा त्रास कमी व्हावा, यासाठी पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती इंदापूर यांच्या वतीने 'सायकल बँक' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाचा लोकार्पण सोहळा कृषी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या शुभहस्ते इंदापूर येथे संपन्न झाला. यावेळी इंदापूर तालुक्यातील पाचवी ते आठवी वर्गातील १११ विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. सायकल मिळाल्याने विद्यार्थिनींमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण होते. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू या उपक्रमाचे महत्व अधोरेखित करीत होते.



कृषी मंत्री श्री. भरणे यांनी यावेळी सांगितले की, पुणे जिल्हा परिषद शिक्षणाच्या क्षेत्रात सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. 'सायकल बँक' ही योजना मुलींच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा देणारी आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना शाळेत जाणे सोपे होईल, प्रवासाचा त्रास कमी होईल आणि नियमित हजेरीत वाढ होईल. शिक्षणाच्या प्रवाहात कोणतीही मुलगी मागे राहू नये, यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल. पुढेही जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये हा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, पंचायत समिती इंदापूरचे पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी तसेच लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभिनव उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मुलींच्या शैक्षणिक संधींना नवी दिशा मिळणार असून, सायकल ही केवळ प्रवासाचे साधन न राहता शिक्षणाची गती वाढविणारे माध्यम ठरणार आहे.



## दगडूशेठ हलवाई गणपतीला १३३ लिटर संत्रा फ्लेव्हर आईस्क्रीमचा नैवेद्य

पुणे : श्रीमान दगडूशेठ हलवाई गणपतीला भक्तगण विविध स्वरूपात नैवेद्य अर्पण करतात. यंदा खास आकर्षण ठरले ते म्हणजे तब्बल १३३ लिटर संत्रा फ्लेव्हर आईस्क्रीमचा नैवेद्य.

पुण्यातील लोकप्रिय किंगा आईस्क्रीम संस्थेकडून हा अनोखा नैवेद्य गणरायाला सादर करण्यात आला. ऑरेंज फ्लेव्हरच्या या प्रसादाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरवर्षी दगडूशेठ बाप्पाच्या मंडपात विविध प्रकारचे तोरण, फुलांचे शृंगार आणि सोन्याचे हार दिसतात. मात्र, या वेळेस आईस्क्रीमचा प्रसाद हा भक्तांसाठी आगळावेगळा अनुभव ठरला. भाविकांमध्येही या अनोख्या नैवेद्याची चर्चा रंगली आहे.

## महत्वाचे...

### पोलीस मुख्यालयात महागणेशोत्सवाचा जल्लोष

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला यावर्षीपासून ‘‘राज्य महोत्सवा‘‘चा दर्जा मिळाला असून तो ‘‘महागणेशोत्सव‘‘ म्हणून साजरा होत आहे. या अनोख्या उत्सवाचे वैभव गुरुवारी (दि. २८) पोलीस मुख्यालयात रंगलेल्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांतून खुलून आले. साऊंड–लाईट शोने सजलेल्या दालनात डॉग शोतील प्रशिक्षित श्वानांची चपळ खेळी, पोलीस बॅण्डचे सुरेल सूर आणि शिवकालीन मर्दानी खेळांच्या थरारक प्रात्यक्षिकांनी प्रेक्षकांची दाद मिळवली. या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) संजय पाटील, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, राजेश बनसोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, पोलीस कुटुंबिय आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पोलीस आयुक्तांनी केले प्रेस फोटोग्राफरचे कौतुक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे फेस्टिवल आणि श्रमिक पत्रकार संघ पुणे यांच्यावतीने बालगंधर्व कलादालनातं शहरातील विविध दैनिकात कार्यरत असणाऱ्या छायाचित्रकारांनी टिपलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले यावेळी पुणे फेस्टिवलचे प्रमुख उद्योजक कृष्णकुमार गोयल,पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील,सचिव मंगेश फल्ले ,पुणे फेस्टिव्हलचे सचिन आडेकर व श्रीकांत कांबळे यांच्यासह सर्व दैनिकतील छायाचित्रकार आणि पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अमितेश कुमार यांनी बारकाईने छायाचित्रांचे प्रदर्शन बघण्याचा आनंद घेतला या प्रदर्शनात सुमारे ३०० फोटो फ्रेम लावण्यात आल्या आहे. पुणे शहरातील विविध ठिकाणी वार्तांकनासाठी गेलेल्या छायाचित्रकारांनी टिपलेल्या क्षणचित्रांचे हे प्रदर्शन पाहून पोलीस आयुक्त भारावून गेले. ते म्हणाले की, हा उपक्रम अतिशय चांगला असून दरवर्षी असे प्रदर्शन पुणे फेस्टिवल च्या माध्यमातून भारवले गेले पाहिले.शहरातील दररोजच्या धावपळीच्या जीवनातील अत्यन्त सूक्ष्म बारकावे यात मला बघायला मिळाले.

### पिस्तूल फिरवण्याचा व्हिडिओ व्हायरल; सांगवीत युवक अटक

**पुणे । प्रतिनिधी**

सोशल मीडियावर देशी बनावटीचे पिस्तूल हाताळतानाचा व्हिडिओ व्हायरल केल्यानंतर सांगवी पोलिसांनी एका २१ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. २७ ऑगस्ट रोजी रात्री औंध जिल्हा रुग्णालयासमोरील पाण्याच्या टाकीजवळ हा प्रकार उघडकीस आला. ओम ऊर्फ नन्या विनायक गायकवाड (वय २१, रा. संगमनगर, जुनी सांगवी) याने व्हिडिओ त्याचाच असल्याची कबुली दिली. त्याच्याकडील पिस्तूल हे त्याचा मित्र आशिष वाघमारे याचे असल्याचे समोर आले आहे. तपासादरम्यान पिस्तूल आणि जिवंत काडतूस इलेक्ट्रिक डीपीजवळ लपवून ठेवलेले पोलिसांच्या हाती लागले. अंदाजे ३० हजार रुपयांचे देशी पिस्तूल व एक काडतूस जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियम १९५९, भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून सांगवी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## सहकारनगर पोलिसांची धडक कारवाई; ३ लाखांचा गांजा जप्त, इसम जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

सहकारनगर पोलीस स्टेशनच्या पथकाने अवैध अंमली पदार्थ विक्रीवर मोठी कारवाई करत एका इसमाला जेरबंद केले असून त्याच्याकडून तब्बल ३ लाख रुपये किमतीचा १० किलो १३८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

सहकारनगर पोलिसांचे वरिष्ठ निरीक्षक विठ्ठल पवार यांच्यासह अंमलदार हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना रांका ज्वेलर्सजवळील मोरे वस्ती परिसरात त्यांना संशयास्पद हालचाल दिसून आली. पोलीस अंमलदार अमोल पवार व अभिजीत वालगुडे यांनी पाठलाग करून प्रसाद गणेश हारगुडे (रा. शंकर महाराज वसाहत, धनकवडी, पुणे) यास पकडले. चौकशीत



त्याच्याकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याच्या ताब्यातील खोलीची तपासणी केली.

तपासात खोलीमध्ये एका कापडी पिशवीत पांढऱ्या रंगाच्या सहा प्लॅस्टिक पिशव्या आढळल्या. त्या सर्वांमध्ये गांजा आढळून आला. आरोपी हारगुडे हा आपल्या साथीदाराच्या सांगण्यावरून हा माल पॅकींग करून विक्रीसाठी तयार करीत असल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली. या कारवाईत एकूण ३ लाख रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला असून सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. क्र. ३६१/२०२५, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २० (ब)(खख)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील नागरिकांना न्याय देण्याकरिता आयोग कटिबद्ध : ॲड. धर्मपाल मेश्राम

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाच्या माध्यमातून राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक न्यायाची प्रतिबद्धता दाखविण्यासोबतच ती प्रतिष्ठापित करण्याकरिता आयोग कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत केले.

ॲड. मेश्राम म्हणाले, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाची १ मार्च २००५ रोजी स्थापना झाली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०२४ मध्ये आयोगाचे



पृथक्करण करत वैधानिक दर्जा देण्याचे काम केले. यामाध्यमातून सामाजिक न्यायाबद्दल असलेली त्यांची प्रतिबद्धता, संवेदनशीलता दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था (बार्टी), आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टार्टी) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यासंस्थेच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील तसेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येते. यामध्यमातून त्यांचे राज्याच्या जडणघडण आणि विकासामध्ये योगदान निर्मितीच्या अनुषंगाने या संस्थेच्या माध्यमातून काम करण्यात येत आहे. या संस्थेच्या कामकाजावर आयोगाचे लक्ष असून कामकाजात अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. काल पार पडलेल्या जन सुनावणीमध्ये बँकिंग सोल्यूशन (बीएस) एज्युकेशन संस्थेबाबत विविध माध्यमातून प्राप्त तक्रारीची दखल घेत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेला सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल आयोगाकडे १५ दिवसात सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, या अहवालानुसार संबंधित संस्थेवर उचित कार्यवाही करण्यात येईल, असेही ॲड. मेश्राम यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यात ग्रामपंचायतीचे नगर परिषदेमध्ये परावर्तन होत असतांना नगर विकास प्रशासनाच्यावतीने सफाई कर्मचारी या पदाचा आकृतीबंधात समावेश केलेला नाही, त्यामुळे अशा कर्मचारी, त्यांच्या कुटुंबियांना शासकीय लाभापासून वंचित राहावे लागले, याबाबत आयोगाने गंभीर दखल घेत नगर विकास प्रशासनाला तात्काळ प्रभावासह कारणे दाखवा नोटीस बजावली असून या पदाला आकृतीबंधात समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे, असेही ॲड. मेश्राम म्हणाले.

## ‘पवित्र रिश्ता’ फेम प्रिया मराठेचं कर्करोगाने निधन; मराठी कलाविश्वावर शोककळा

**मुंबई । प्रतिनिधी**

**जन्म – २३ एप्रिल १९८७, ठाणे**

**मृत्यू – ३१ ऑगस्ट २०२५, मीरा रोड**

'पवित्र रिश्ता', 'साथ निभाना साथियाँ', 'तुझेच मी गीत गात आहे' यांसारख्या हिंदी आणि मराठी मालिकांमधून आपल्या दमदार अभिनयकौशल्याची छाप सोडणारी अभिनेत्री प्रिया मराठेचं निधन झालं आहे.

वयाच्या ३८ व्या वर्षी तिने अखेरचा श्वास घेतला आहे. आज (रविवार) पहाटे चार वाजता कर्करोगाने प्रियाचं निधन झाल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या वर्षभरापासून प्रिया लाइमलाइटपासून दूरच होती. सोशल मीडियावरही ती सक्रिय नव्हती. अचानक तिच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. प्रिया शेवटची 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. परंतु ही मालिकासुद्धा तिने मधेच सोडली होती. सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट करत तिने याबद्दलची माहिती चाहत्यांना दिली होती. त्यात तिने आरोग्याचं कारण दिलं होतं.

प्रियाने 'या सुखांनो या' (२००६) या मालिकेतून टेलिव्हिजनवर पदार्पण केलं होतं. त्यानंतर तिने अनेक मराठी मालिकांमध्ये दमदार भूमिका साकारल्या होत्या. 'चार दिवस सासूचे'मध्येही ती



झळकली होती. त्यानंतर 'कसम से' (२००८–२००९) या मालिकेतून तिने हिंदी टेलिव्हिजन क्षेत्रात पाऊल ठेवलं होतं. 'पवित्र रिश्ता' (२००९–२०१३) या लोकप्रिय हिंदी मालिकेत तिने वर्षाची भूमिका साकारली होती. 'बडे अच्छे लगते है' या गाजलेल्या मालिकेत ती ज्योती मल्होत्राच्या भूमिकेत होती. मराठी चित्रपट 'विघ्नहर्ता महागणपती' (२०१६) आणि 'किरण कुलकर्णी व्हर्सेस किरण कुलकर्णी' (२०१६) मध्येपण प्रियाने काम केले. स्टार प्लस वाहिनीवरील 'साथ निभाना साथियाँ' (२०१७) ह्या मालिकेत प्रिया ने भवानी राठोड ही भूमिका साकारली होती. प्रिया मराठेनं २४ एप्रिल २०१२ रोजी अभिनेता शंतनू मोघेशी लग्न केलं होतं.

छोट्या पडद्यावरील मालिकांमध्ये प्रिया मराठे घराघरात पोहोचली होती. प्रेक्षकांच्या मनात तिने अढळ स्थान निर्माण केलं होतं. भूमिका नकारात्मक असली तरी त्यातूनही तिने प्रेक्षकांची मनं जिंकली होती.

## नवीन थेरगाव रुग्णालयाला डीएनबी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळणे हा पिंपरी चिंचवडसाठी एक ऐतिहासिक टप्पा : आयुक्त सिंह

### नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस तर्फे डीएनबी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी थेरगाव रुग्णालयाला मंजुरी

**पिंपरी । प्रतिनिधी**

नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयाला डीएनबी (जनरल मेडिसिन) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी २०२५ प्रवेश सत्राकरिता चार जागा मंजूर केल्या आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. पिंपरी चिंचवडसाठी हा एक ऐतिहासिक टप्पा आहे, असेही ते म्हणाले.

नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांनी पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी थेरगाव रुग्णालयात १२, आकुर्डी रुग्णालयात ८ व भोसरी रुग्णालयात २ अशा एकूण २२ जागांकरिता यापूर्वीच मान्यता दिली आहे. सदर अभ्यासक्रम संबंधित रुग्णालयांमध्ये सुरू देखील झालेले आहेत. तर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात नॅशनल मेडिकल



कौन्सिल तर्फे यापूर्वीच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. याच धर्तीवर आता नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी थेरगाव रुग्णालयास मान्यता मिळाल्यामुळे महापालिकेच्या आरोग्य सेवेला बळकटी मिळणार आहे.

नव्याने मिळालेल्या या मान्यतेमुळे नवीन थेरगाव रुग्णालयाचे शैक्षणिक व वैद्यकीय स्वरूप अधिक सक्षम होणार आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्णसेवा दिली जाते. विविध आजारांवरील उपचारासोबतच प्रगत निदान सुविधा येथे उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत वैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, रुग्णसेवेत सक्रिय सहभाग आणि वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाल्याने त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल. या प्रक्रियेतून रुग्णसेवेचा दर्जाही उंचावणार असून नागरिकांना अधिक परिणामकारक व तत्पर आरोग्यसेवा मिळेल.

नॅशनल बोर्ड ऑफ एग्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस नवी दिल्ली यांच्या अभ्यासक्रमामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेची रुग्णालये केवळ आरोग्यसेवा पुरविण्यापुरती मर्यादित न राहता वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणूनही विकसित होणार आहेत. या माध्यमातून वैद्यकीय विद्यार्थ्यांना आधुनिक पद्धतीने वैद्यकीय ज्ञान आत्मसात करण्याची व भविष्यातील आरोग्यसेवेत महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी उपलब्ध होईल.

> **“ पिंपरी चिंचवड महापालिका आपल्या आरोग्य यंत्रणेत सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. उच्च दर्जाची आरोग्यसेवा, आधुनिक सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासोबतच शैक्षणिक व संशोधनाच्या संधी निर्माण करणे हा महापालिकेचा उद्देश आहे. नवीन थेरगाव रुग्णालयाला डीएनबी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाल्याने आपल्या रुग्णालयांची विश्वासार्हता आणि क्षमता अधोरेखित झाली आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील कुशल डॉक्टर्स तयार होणार असून यामुळे नागरिकांना अधिक उच्च गुणवत्तेची आरोग्यसेवा मिळण्यास मदत होईल.**
> **– शेखर सिंह,**
> **आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **“ थेरगाव रुग्णालयाला मिळालेली ही मान्यता म्हणजे अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण परिश्रमाचे फलित आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, वैद्यकीय क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा लाभ होईल. या प्रक्रियेतून रुग्णसेवा अधिक सक्षम होईल तसेच शैक्षणिक व संशोधन कार्यालाही चालना मिळेल.**
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> **आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

### आधार संच वितरण साठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

माहिती व तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचे कडून पुणे जिल्ह्यास आधार संच प्राप्त झाले असून जाहिरातीत नमूद ठिकाणाकारीता आधार संच वितरणासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. आधार संच जिल्ह्यातील पुढे नमुद ग्रामीण महसूल मंडळ व पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रात वितरण करणेकामी पात्रआपले सरकार सेवा केंद्र चालकांनी; जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत वेबसाइट www.pune.gov.in वर जाऊन अर्जाचा नमुना, पात्रतेचे निकष, प्रस्तावित आधार केंद्राबाबतची माहिती तसेच इतर आवश्यक माहिती डाऊनलोड करून घ्यावी. इच्छुक आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी अर्ज व आवश्यक कागदपत्रे २६ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११:०० वाजल्यापासून ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, संजय गांधी योजना शाखा, ३९;अ३९; विंग, ४ था मजला, डॉ बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पुणे येथे प्रत्यक्ष सादर करावे, असे प्रसिद्धीपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.